# <u>प्रेसनोट</u>

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. १२/०७/२०१८

## बारामती शहर पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण येथील पोलीस हवालदारास वीस रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार यांच्या जमिनीच्या व्यवहाराच्या फसवणुकीबाबत बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार दादासाहेब ठोंबरे हे करीत आहेत. नमुद गुन्हयाच्या तपासामध्ये तक्रारदार यांना मदत करण्यासाठी बारामती शहर पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण येथील पोलीस हवालदार, दादासाहेब ठोंबरे याने तक्रारदार यांचेकडे २०,०००/- रूपये लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक १२/०७/२०१८ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक दादासाहेब ठोंबरे, पोलीस हवालदार, बारामती शहर पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण, पुणे याने तक्रारदार यांच्या जमिनीच्या व्यवहाराबाबत झालेला फसवणुकीच्या गुन्हयाच्या तपासामध्ये तक्रारदार यांना मदत करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे २०,०००/- रूपये लाचेची मागणी करून २०,०००/- रूपये लाचेची मागणी करून रक्कम स्विकारली.

त्यावरुन दिनांक १२/०७/२०१८ रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक दादासाहेब महादेव ठोंबरे, वय - ४७, पोलीस हवालदार ब.नं. ९४९, नेमणुक बारामती शहर पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण, याने तक्रारदार यांचेकडून २०,०००/- रूपयांची लाचेची रक्कम बारामती शहर पोलीस स्टेशनच्या समोर स्विकारल्यावर त्याला रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचेवर बारामही शहर पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण, येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई हि मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे-
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**
८. **Mobile App - www.acbmaharashtra.net**

( सुहास नाडगौडा )
सहा.पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.